जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर
इमेल-cp.thane.pro@mahapolice.gov.in
मो.क्र.9819208279

प्रेसनोट **दिनांक ०५.०३.२०२५**

''वेश्या व्यवसाय करवुन घेणाऱ्या दलाल पुरूषास गुन्हे शाखेकडुन अटक''

दिनांक ०४/०३/२०२५ रोजी अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीमती/चेतना चौधरी यांना माहिती मिळाली की, बंटी ढाबा फॅमिली रेस्टॉरंट, मुंब्रा पनवेल रोड, गोठेघर फाटा, डायघर ठाणे पश्चिम या ठिकाणी एक पुरूष दलाल दोन पिडीत व असहाय्य मुलींना फुस लावुन वेश्यागमनासाठी आणणार आहे. सदर माहिती वरून अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाच्या पोलीस पथकाने बंटी ढाबा फॅमिली रेस्टॉरंट, मुंब्रा पनवेल रोड या ठिकाणी सापळा लावून एक पुरूष दलाल नामे दिनेश गोविंद प्रसाद, वय ४० वर्षे, रा.खोणीगाव, रूम नं ४, कल्याण यास ताब्यात घेवुन त्याच्या रखवालीत असलेल्या दोन पिडीत मुलींची तात्काळ सुटका केली.

सदर प्रकाराबाबत शिळडायघर पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि.नंबर । २५४/२०२५ भारतीय न्याय संहिता सन २०२३ चे कलम ९६, १४३ (१), १४३(३) सह लैंगिक अपराधापासून बालकांचे संरक्षण अधिनियम सन २०१२ चे कलम १७ सह अनैतिक व्यापार (प्रतिबंध) अधिनियम सन १९५६ चे कलम ४ व ५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीस अटक करण्यात आली आहे. तसेच आरोपी दिनेश गोविंद प्रसाद याचेकडे कसून चौकशी केली असता त्यानेच पिडीत अल्पवयीन मुलींस उत्तर प्रदेश येथुन पळून आणल्याने त्याचे विरूध्द दोहरीघाट पोलीस ठाणे येथे २३९/२०२४ दिनांक ०१/१२/२०२४ रोजी भारतीय न्याय संहिता सन २०२३ चे कलम ८७,१३७(२) अन्वये गुन्हा दाखल आहे.

सदरची कारवाई श्री.अमरसिंह जाधव, पोलीस उप आयुक्त, गुन्हे, श्री.धनाजी क्षिरसागर सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रतिबंध), गुन्हे यांच्या मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीमती/चेतना चौधरी, मपोउपनि/स्नेहल शिंदे, श्रेपोउपनि/एन डी क्षिरसागर, सपोउपनि/दिपक वालगुडे, सपोउपनि/दिपक भोसले, पोहवा/ किशोर पाटील, मपोहवा/ आर यु सुवारे, मपोअंम/हर्षदा थोरात, पी जी खरात, चापोशि/८१७४ उदय घाडगे यांनी यशस्वीपणे पार पाडलेली आहे.

(शैलेश साळवी)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर